कोळशेवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ २४४/२०२६ दि. २७/११/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :—

ज्याअर्थी, कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत मौजे सोनारपाडा ते पी.एन.टी.चौक रस्ता येथे उडड्राणपुलाचे बाधकाम करण्यात येणार आहे. सदर काम करतेवेळी एकुण १३ पीलर व २ अबुटमेंटचे बाधंकाम करण्यात येणार आहेत. सदरचे काम हे दिनांक २५/११/२०२६ ते दिनांक ३१/०३/२०२८ रोजी पावेतो करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

प्रवेश बंद –	**१)** शिळ कल्याण रोड वरून मानपाडा डोंबिवली रोडने डोंबिवली शहरात जाणाऱ्या ६ चाकी व त्यावरील सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना **मानपाडा चौक, क्राईम ब्रांच समोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने ही मानपाडा चौक, शिळ कल्याण रोड – अनंतम रिजंन्सी चौक येथुन डावीकडे वळण घेवुन इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**२)** डोंबिवली शहरात मानपाडा डोंबिवली रोडने सागाव – मानपाडा चौक दिशेने जाणाऱ्या ६ चाकी व त्यावरील सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना **चार रस्ता (डोबिंवली वाहतूक उपविभाग हद्द) येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने चार रस्ता, डोंबिवली येथून डावीकडे वळण घेवून एम.आय.डी.सी अंर्तगत रस्ते अथवा छत्रपती शिवाजी महाराज चौक (घरडा सर्कल)– अनंतम रिजन्सी चौक येथुन इच्छित स्थळी जातील.
हलके वाहन पर्यायी रस्ता	शिळ कल्याण रोडवरून डोंबिवली शहरात जाणाऱ्या रिक्षा, कार, मोटारसायकल इ. वाहनांनी मानपाडा डोबिंवली रोड – भोपर कमान येथून डावीकडे वळण घेवनू – नांदीवली डोंबिवली – स्वामी समर्थ चौक – नांदीवली नाला या मार्गाचा वापर करावा.
हलके वाहन पर्यायी रस्ता	शिळ कल्याण रोडवरून डोंबिवली शहरात जाणाऱ्या रिक्षा, कार, मोटारसायकल इ. वाहनांनी मानपाडा डोबिंवली रोड – सागर ऑटो स्पेअर पार्ट समोरील पिंपळाचे झाड येथून उजवीकडे वळण घेवून – एम. आय.डी.सी अंतर्गत मार्गाचा वापर करावा.
हलके वाहन पर्यायी रस्ता	डोंबिवली शहरातून मानपाडा डोबिंवली रस्त्यावरून जाणाऱ्या रिक्षा, कार, मोटारसायकल इ. वाहनांनी चार रस्ता अथवा आईस फॅक्टरी येथून डावीकडे वळण घेवून पुढे कल्याण शिळ मार्गाचा वापर करावा.

सदर अधिसूचना दिनांक २५/११/२०२६ रोजी पासुन ते दिनांक ३१/०३/२०२८ रोजी पर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक.
प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.
प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.